माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १३०/२०२२**

**अपिलार्थी, श्री. ज्ञानेश्वर हीरामणजी मारवाडे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन**
**जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा,** ता. जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा,**ता. जि. भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.१०.२०२३**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०८.२०२१ | ०२.०९.२०२१ | २८.०९.२०२१ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०६.०८.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " आपल्या कार्यालयामध्ये दि. १९.०७.२०२१ ला एक तक्रार अर्ज सादर करण्यात आला त्या अर्जावर आपल्या कार्यालयाकडून काय कार्यवाही करण्यात आली यावी माहीती देण्यात यावी " याविषयी माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२.०९.२०२१ रोजी अपिलार्थीस २ पृष्ठांची माहिती दिलेली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २८.०९.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “ मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे ” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी विहीत मुदतीत कोणत्याही प्रकारची सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे **दिनांक ०७.०१.२०२२ रोजी** " मागितलेली माहिती तसेच अपिलीय अधिकाऱ्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नसल्यामुळे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १७.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ११.१०.२०२३ रोजी माहिती अधिकार सप्ताहाचे औचित्य साधून आयोगाकडे प्राप्त भंडारा जिल्हयाशी संबंधित व्दितीय अपीलाची सुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, जि.का. भंडारा, श्री. मधुसूदन चवळे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नमूद केलेल्या दिनांक १९.०७.२०२१ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी, भंडारा यांनी दिनांक २६.०८.२०२१ रोजी तहसिलदार, भंडारा यांना सुचीत केले की, सदर तक्रार तहसिल कार्यालयातील आवक-जावक विभागाशी संबंधित असल्याने तक्रारदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित आवक-जावक लिपीकाची चौकशी करुन तक्रारदाराच्या तक्रार अर्जाचे निराकरण करुन तक्रारदारास परस्पर कळवावे व केलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल या कार्यालयास सादर करावा, असे नमूद केले आहे. त्याप्रमाणे दिनांक ०२.०९.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या वतीने अपिलार्थी श्री. मारवाडे यांना श्री. लोहबरे तहसिल कार्यालय भंडारा येथे कार्यरत आवक जावक विभागातील लिपीक यांचेबाबत केलेल्या तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीची २ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस पुरविलेली असल्याचे आढळून येते. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०१.२०२२ रोजी मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे तसेच प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेवून आदेश पारीत न केल्यामुळे आयोगासमोर व्दितीय अपील दाखल केले आहे.

प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या मुळ माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर तात्काळ प्रतिसाद देण्यात आलेला आहे. तसेच प्रशासकीय स्तरावर देखील निवासी उपजिल्हाधिकारी भंडारा यांनी त्याची दखल घेवून तहसिलदार भंडारा यांना चौकशी करण्याविषयी निर्देशीत केले आहे. त्याअनुषंगाने करण्यात आलेली चौकशी, सादर करण्यात आलेला अहवाल याविषयी पुर्ण प्रक्रिया पार पाडली असून त्याबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अपिलार्थी श्री. मारवाडे यांना अंतिम चौकशी अहवाल व त्याअनुषंगाने उपलब्ध असलेली संपूर्ण कागदपत्रे साक्षांकित करुन तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत पुरविण्यात आलेल्या माहितीच्या शिक्कासह व माहिती अधिकाराच्या लोगोसहीत अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य पुरविण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★ नागपूर ★ सत्यमेव जयते

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.१०.२०२३**

जावक क्रमांक 6847 दिनांक 14 DEC 2023